# विशेष मुलांना दिली राइझिंग पुणे सुपरजायंटच्या खेळाडूंना भेटण्याची संधी

पुणे : गल्फ लुब्रिकंट्स इंडिया लिमिटेडने, फिनोलेक्स इंडस्ट्री लिमिटेडचा सीएसआर प्रकल्प असलेल्या मुकुल माधव फाऊंडेशनबरोबर भागीदारी केली आहे. याअंतर्गत अपंग कल्याणकारी शिक्षण संस्थेच्या विशेष मुलांसाठी, पुणेस्थित आयपीएल फ्रांचाइजीच्या राइझिंग पुणे सुपरजायंटच्या खेळाडूंबरोबर संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्टीव्हन स्मिथ, फाफ दु प्लेसिस आणि जयदेव उनाडकत हे टीमचे स्टार खेळाडू यासाठी उपस्थित होते. तसेच ते एनजीओच्या ३० मुलांबरोबरच्या धमाल कार्यक्रमात सहभागीही झाले होते.